वर्ष-०६ | अंक-४८ | मुंबई, मंगळवार २० ते २६ ऑक्टोबर-२०२० | पृष्ठ-४
मूल्य २/- रुपये
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र
●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक ●कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक ● सह संपादक : सौ. डॉ. अश्विनी नाईक

PG 2 माझे कुटुंब - माझी जबाबदारी' मोहीम पहिल्या टप्प्यातील यशस्वी अंमलबजावणीनंतर दुस-या टप्प्याला सुरूवात
3 → निसर्गाचे संतुलन बिघडले अनाकलनीय हवामानामुळे...
कोरोनामध्ये ८५ हजार बेरोजगारांना रोजगार ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

# आजही मास्क हीच आपल्यासाठी लस- मुख्यमंत्री




मुंबई:
कोरोना विरुध्दचा लढा आता निर्णायक वळणावर आला आहे. यावर लस प्राप्त होईपर्यंत मास्कच उत्तम लस ठरणार आहे, याची जाण ठेवा आणि इतरांना जाणीव करुन द्या. कोरोनाची दुसरी लाट येवू द्यायची नाही यासाठी ꣿ अर्थात मास्क, अंतर आणि हातांची स्वच्छता अशी शपथ सर्वांनी घ्यावी असे प्रतिपादन मुख्यमंत्री उध्दव बाळासाहेब ठाकरे यांनी रत्नागिरी रुग्णालयातील प्लाझ्मा थेरपीसाठीच्या अफेरेसिस युनिटच्या ऑनलाईन उद्घाटन प्रसंगी केले.
दूरदृश्य प्रणालीच्या सहाय्याने आज या सुविधेचे उद्घाटन झाले. जिल्हा रुग्णालयात अशी व्यवस्था उपलब्ध झालेला रत्नागिरी हा राज्यातील पाहिला जिल्हा ठरला आहे. या कार्यक्रमास मुंबईतून पालकमंत्री अङ अनिल परब, जालन्यातून सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे, रत्नागिरीतून उच्च व तंत्रशिक्षण मंत्र उदय सामंत यांच्या सोबतच खासदार विनायक राऊत दिल्ली येथून सहभागी झाले. तसेच जिल्हा परिषदेचे अध्यक्ष रोहण बने, आमदार राजन साळवी, आमदार भास्कर जाधव, आमदार शेखर निकम यांचीही उपस्थिती होती.
कोकणला लाटांचा सामना कसा करायचा ते शिकवण्याची गरज नाही पण कोरोनाबाबत दुसरी लाट न येवू देणे ही प्राथमिकता आहे. कोरोनामुक्त झालेली एक व्यक्ती एका महिन्यात दोन वेळा प्लाझ्मा दान करुन चार जणांचा जीव वाचवू शकते. त्यामुळे येणाऱ्या काळात मृत्यूदर देखील कमी होईल असे मुख्यमंत्री म्हणाले.




माझं कुटुंब माझी जबाबदारी मोहिमेत रत्नागिरीत झालेले काम कौतुकास्पद आहे असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की याच पध्दतीने आगामी काळात जाणीवर जागृती करुन कोरोनाचा घसरता आकडा आणखी कमी करा. युरोपप्रमाणे पुन्हा लॉकडाऊन की मास्क, सुरक्षित अंतर आणि हातांची स्वच्छता याबाबत प्रत्येकापर्यंत जागृती करा.

# TRP Scam प्रकरणातील FIR रद्द करण्यास हायकोर्टाचा नकार; तर गोस्वामींची चौकशी होणार





मुंबई पोलिसांनी उघड केलेल्या इलेक्ट्रॉनिक माध्यमातील TRP Scam प्रकरणी मुंबई हायकोर्टात रिपब्लिक टीव्हीच्यावतीने याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी दरम्यान अर्णब गोस्वामी यांच्या चौकशीआधी त्यांना समन्स देण्यात यावे, असे निर्देश हायकोर्टाने मुंबई पोलिसांना दिले. न्यायाधीश एस.एस.शिंदे आणि न्यायाधीश एम.एस. कर्णिक यांच्या खंडपीठासमोर या याचिकेची सुनावणी झाली. तसेच ५ नोव्हेंबर पर्यंत या प्रकरणाच्या चौकशीचे कागदपत्र बंद लिफाफ्यात हायकोर्टासमोर सादर करावेत, असेही निर्देश मुंबई पोलिसांना देण्यात आले आहेत.
रिपब्लिकन टीव्हीची मालकी असलेल्या एआरजी आऊटलियर प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आणि या वृत्तवाहिनीचे संपादक अर्णब गोस्वामी यांनी मुंबई हायकोर्टात त्यांच्यावर झालेला एफआयआर रद्दबातल करण्यासाठी याचिका दाखल केली होती. तसेच या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, यासाठी हे प्रकरण सीबीआयकडे देण्यात यावे, अशीही मागणी याचिकेत करण्यात आली होती. हायकोर्टाने हा तपास थांबवून याचिकेवर सुनावणी सुरु आहे तोपर्यंत याचिककर्त्यांवर कोणतीही दंडात्मक कारवाई करु नये, अशीही एक मागणी या याचिकेत समाविष्ट करण्यात आली होती.
अर्णब गोस्वामी यांची बाजू मांडण्यासाठी देशातील प्रथितयश वकिल हरीश साळवे हे काम पाहत आहेत.
तर मुंबई पोलिसांची बाजू मांडण्याचे काम काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि प्रसिद्ध विधिज्ञ कपिल सिब्बल करत आहेत. साळवे यांनी बाजू मांडतांना सांगितले की, मुंबई पोलीस गोस्वामी यांना मुद्दामून निशाणा बनवत असून त्यांना अटक केली जाऊ शकते. यावर प्रतिवाद करताना कपिल सिब्बल म्हणाले की, आतापर्यंत आरोपींच्या यादीत गोस्वामी यांचे नावच घेतलेले नाही. त्यामुळे त्यांना अटकेपासून सरंक्षण देण्याचा प्रश्नच येत नाही. कपिल सिब्बल पुढे म्हणाले की, मुंबई पोलिसांनी टीआरपी घोटाळ्याप्रकरणी आतापर्यंत ८ लोकांना समन्स बजावले असून त्यांना चौकशीसाठी पाचारण केले होते. मात्र यापैकी कुणालाही अटक केलेली नाही. त्यामुळे चौकशी सुरु असतानाच याचिकाकर्ते एफआयआर रद्द करण्याची मागणी कशी करु शकतात? असा प्रश्नही सिब्बल यांनी उपस्थित केला.

# दहावी, बारावीची फेरपरीक्षा नोव्हेंबरमध्ये



कोरोनामुळे दहावी, बारावीचा निकाल विलंबाने जाहीर झाला. त्यामुळे राज्य मंडळातर्फे जुलै-ऑगस्टमध्ये घेण्यात येणारी फेरपरीक्षा नोव्हेबर-डिसेंबरमध्ये घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास २० ते २९ ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. दहावी, बारावी परीक्षेस नियमित पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेंतर्गत परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची अर्ज ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत. दहावी, बारावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर फेरपरीक्षेबाबत राज्य मंडळाकडून कोणताही निर्णय जाहीर करण्यात येत नव्हता. त्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. परीक्षा कधी होणार, आम्हाला पुढील वर्षामध्ये प्रवेशाची संधी उपलब्ध होईल का असा प्रश्न विद्यार्थ्यांकडून विचारण्यात येत होता. मात्र आता माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (दहावी) आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्राची (बारावी) परीक्षा नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेचे अर्ज ꣿ.ꣿ.ग्ह या संकेतस्थळावर भरायचे आहेत. अर्ज भरण्यास २० ते २९ ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. तर विलंब शुल्कासह ३० ऑक्टोबर ते २ नोव्हेंबरपर्यंत मुदत दिली आहे. अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी त्यांच्या माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये जाऊन भरायची आहेत, अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी दिली.

# दीव, दमणवरुन महाराष्ट्रात विक्रीस येणारा लाखो रुपयांचा मद्यसाठा जप्त; गुजरातच्या एकाला दुसऱ्यांदा अटक



दमण व दीव येथील दोन कारमधून लाखो रुपयांचा अवैध मद्यासासाठा महाराष्ट्रात विक्रीसाठी आणला जात असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभाग, नाशिकच्या विभागीय भरारी पथकास मिळाली. त्यानुसार विभागीय भरारी पथकाने सोमवारी (दि.१९) त्र्यंबकेश्वर तालुक्यातील हरसूलजवळ सापळा टाकत चौघांना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून दोन कारसह ४३ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
महाराष्ट्रात बंदी असलेली व दादरा नगर हवेली निर्मित बेकायदा मद्य महाराष्ट्रात विक्रीसाठी आणले जात असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागास मिळाली. त्यानुसार विभागीय भरारी पथकाने सोमवारी रात्री सापळा रचला. पथकाने दोन संशयित कारची तपासणी केली असता कारमध्ये अवैध मद्यसाठा आढळून आला. पथकाने दोन कारमधील चौघांना अटक केली असून त्यांच्याकडून ४३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. विशेष म्हणजे, दोन दिवसांपुर्वीच १४ ऑक्टोबर रोजी पथकाने दीपक पटेल याला स्कार्पिओच्या चोरकप्प्यात मद्याची वाहतूक केल्याप्रकरणी हरसूल पेठ रोडवरील धानपाडा शिवारात अटक केली होती. तो जामिनावर बाहेर आला होता. त्याला दुसऱ्यांदा अटक करण्यात आली असून त्यांच्यावर 'एक्साईज'कडून एमपीडीएअंतर्गत कारवाई केली जाणार आहे.
आठ दिवसांत तिसरी कारवाई

...पान २ वर...

# जिल्ह्यात ३,४९४ बालकांनी आरटीई प्रवेश नाकारले, शिक्षण विभागाची माहिती




ठाणे : शिक्षणाचा हक्क (आरटीई) कायद्याखाली दुर्बल घटक आणि मागासवर्गीय परिवारांतील बालकांना त्यांच्या जवळच्या शाळेत २५ टक्के शालेय प्रवेश मोफत दिले जात आहेत. यानुसार, जिल्ह्यातील ९,३२६ मुलांची लॉटरी सोडतद्वारे निवड झाली. यापैकी ५,६७७ जणांचे प्रवेश झाले असून १५२ जणांना विविध कारणांखाली प्रवेश नाकारले आहेत. उर्वरित ३,४९४ बालकांच्या प्रवेशासाठी आईवडील शाळेत गेले नाहीत. त्यामुळे त्यांनी प्रवेश नाकारल्याचे उघड झाले आहे.यंदा ६६९ शाळांमध्ये 'आरटीई'खाली प्रवेश दिले गेले आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सीनिअर केजी ते पहिलीच्या वर्गात प्रवेश दिले जात आहेत. या प्रक्रियेनंतर प्रतीक्षायादीतील १,८९४ बालकांची प्रवेशासाठी निवड झाली आहे. मात्र, यातील १३४ जणांनीच प्रवेश घेतले आहेत. तर, १,७५८ बालकांचे पालक प्रवेशासाठी शाळेत गेलेले नाहीत. उर्वरित बालकांची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. पण, लॉकडाऊनमुळे प्रवेश रखडले

...पान ४ वर...

# घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना अटक; मोबाईलसह कपड्यांच्या दुकानात केलेली घरफोडी



नवी मुंबई : घरफोडी प्रकरणी गुन्हे शाखा पोलिसांनी दोघांना अटक केली असून त्यांच्या तिसऱ्या साथीदाराचा शोध सुरु आहे. त्यांच्याकडून १ लाख १७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तुर्भे व तळोजा येथे दुकानात घरफोडीच्या घटना काही दिवसांपूर्वी घडल्या होत्या. या गुन्ह्यात सराईत सोनसाखळी चोराचा समावेश असल्याची शक्यता होती. त्यानुसार गुन्हे शाखा १ चे पथक गुन्हेगारांच्या मागावर होते. यादरम्यान काही संशयित गुन्हेगार तुर्भे रेल्वेस्थानक जवळ येणार असल्याची

...पान २ वर...

# सरकारी धान्याची अफरातफर करणारे माफिया अजूनही फरार


दिलीप ठक्कर


अशोक ठक्कर


राजकुमार केसर वानी


दीनानाथ यादव

सरकारी धान्य गरीब लोकांपर्यंत पोहचतच नाही यामध्ये अनेक माफिया टोळी अफरातफर करण्यात गुंतले आहेत विविध भागात सरकारी धान्याच्या गोण्या बदली करून दुसऱ्या गोणीत धान्यभारून पुन्हा बाजारात विकले जाते अनिल अग्रवाल या जागृत नागरिकांनी सदरची बातमी एम एच बी पोलीस ठाण्यात दिली असता या मध्ये राजकुमार केसर वानी, अशोक ठक्कर, दिलीप ठक्कर, दीनानाथ यादव, असे माफिया कार्यरत असल्याची खबर दिली असता मात्र ट्रक ड्रायव्हर व नकली गोडाऊन मालक याना पकडण्यात आले आहेत मुख्य आरोपी फरार आहेत असे अनिल अग्रवाल या नागरिकांचे म्हणणे आहे गरीब जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या रक्त पिपासू माफियांना कधी जेरबंद करणार असे सवाल जनसमानात विचारले जातात पोलिसांच्या म्हणण्यानुसार लवकरच आणखी तपास करून आरोपींना पकडू असे आश्वासन देण्यात आले

# राज्यपालांच्या हस्ते डबेवाल्यांना सायकल वाटप



मुंबईतील सर्व डबेवाले मेहनत करून लोकांना जेवण पोहोचविण्याचे पुण्यकर्म करीत आहेत. चांगले काम करणाऱ्याला ईश्वर नेहमी मदत करीत असतो. आज डबेवाले सायकलवरून फिरत असले तरीही त्यांची मुले शिक्षणाच्या माध्यमातून स्वकर्तृत्वावर प्रगती करून मोटरकार व विमानाने फिरतील असा विश्वास राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी येथे व्यक्त केला. राज्यपालांच्या हस्ते मुंबईतील निवडक डबेवाल्यांना राजभवन येथे सोमवारी (दि. १९) सायकल वाटप करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. श्री साई श्रद्धा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात १२ डबेवाल्यांना प्रातिनिधिक स्वरूपात सायकलच्या चाव्या देण्यात आल्या. श्री साई श्रद्धा प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक करताना राज्यपाल म्हणाले की परोपकार करण्याची क्षमता ईश्वराने केवळ मनुष्याला दिली आहे, त्याचा माणसाने सदुपयोग केला पाहिजे. आपल्या देशात गरिबात गरीब व्यक्तिमध्ये आपल्या ताटातून अर्धे जेवण दुसऱ्या गरजूला देण्याची भावना आहे. अशा परोपकारी लोकांमुळेच समाज जिवंत राहतो, असे त्यांनी सांगितले. श्री साई श्रद्धा प्रतिष्ठानचे शुभ्रांशु दिक्षीत यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून प्रतिष्ठानतर्फे करोना काळात केलेल्या समाजोपयोगी उपक्रमांची माहिती दिली. करोना काळात अनेक डब्बेवाल्यांच्या सायकली बंद पडून बिघडल्या व त्यांचा रोजगारही गेला. या सर्वांना पुनश्च रोजगार मिळवा या दृष्टीने सायकल वाटप करण्याचे ठरवले, असे त्यांनी सांगितले. यावेळी मुंबई डब्बावाला संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर उपस्थित होते.

# माझे कुटुंब - माझी जबाबदारी' मोहीम पहिल्या टप्प्यातील यशस्वी अंमलबजावणीनंतर दुस-या टप्प्याला सुरूवात

महाराष्ट्र शासनाच्या वतीने १५ सप्टेंबरपासून राबविण्यात येत असलेल्या 'माझे कुटुंब - माझी जबाबदारी' मोहीमेचा पहिला टप्पा नवी मुंबई महानगरपालिकेने १० ऑक्टोबरपर्यंत यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. आता १४ ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या दुस-या टप्प्यातील सर्वेक्षणाला जबाबदारीने सुरूवात करण्यात आलेली आहे. मोहीमेच्या पहिल्या टप्प्याकरिता राज्य शासनामार्फत देण्यात आलेल्या ३,१६,४४९ कुटुंब सर्वेक्षणाच्या उद्दिष्टापेक्षा अधिक म्हणजे ३,३५,४६९ कुटुंबांचे सर्वेक्षण महानगरपालिकेच्या ६७० पथकांनी व्यवस्थितरित्या पूर्ण केले आहे. यामध्ये तब्बल १०,५३,८९६ नागरिकांचे आरोग्य सर्वेक्षण पूर्ण झालेले आहे. आता दुस-या टप्प्यात आधीच्या सर्वेक्षणात नोंदणी करण्यात आलेल्या कुटुंबांना ही पथके पुन्हा भेटी देऊन त्यांच्या आरोग्याची अद्ययावत माहिती घेऊन शासनाच्या अपमध्ये नोंदविणार आहेत.

मुख्यमंत्री ना.श्री.उध्दव ठाकरे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'माझे कुटुंब - माझी जबाबदारी' मोहीमेचो मुख्य उद्दिष्ट कोरोनाबाधितांचा जलद शोध घेऊन त्यांना उपचाराच्या कक्षेत आणणे व त्यांच्यापासून कोरोनाचा संभाव्य प्रसार टाळणे हे आहे. या मोहीमेला सुसंगत अशी कार्यवाही महापालिका आयुक्त श्री. अभिजीत बांगर यांनी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात 'मिशन ब्रेक द चेन' हाती घेऊन सुरूवातीपासूनच राबविली असून 'जलद रूग्णशोध (ट्रेस), त्यांची तपासणी (टेस्ट), त्वरित उपचार (ट्रिट )' या त्रिसूत्रीच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर दिलेला आहे. त्यामुळे आयुक्तांनी शासनाचे 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' हे अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्याकडे विशेष लक्ष दिले. महानगरपालिका क्षेत्रात दररोज होणा-या सर्वेक्षणाचा वेबिनारव्दारे विभागनिहाय बारकाईने आढावा घेतला. एखाद्या विभागात कमी सर्वेक्षण झाल्यास त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या तातडीने दूर केल्या. यातूनच ६७० पथकांनी तब्बल ३ लक्ष ३५ हजार ४६९ कुटुंबांचे सर्वेक्षण करून १० लक्ष ५३ हजार ८९६ नागरिकांची आरोग्यविषयक माहिती नोंदीत करून घेतली.



दोन ते तीन जणांचे प्रत्येक पथक दररोज ५० ते ५५ घरांना भेट देऊन त्या कुटुंबातील सदस्यांची माहिती नोंदवित होते तसेच त्यांचे तापमान व ऑक्सिजन पातळीही मोजून नोंदणी करून घेत होते. आता १४ ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या दुस-या टप्प्यात हीच पथके पहिल्या टप्प्यात भेटी दिलेल्या घरांमध्ये पुन्हा जाऊन त्या नागरिकांचे सद्यस्थितीतील शारीरिक तापमान तसेच ऑक्सिजन पातळी तपासून नोंदविणार आहेत. यामधून या आधीच्या सर्वेक्षणात नागरिकांच्या आरोग्यस्थितीची नोंदणी झालेली असल्याने त्यांच्या आरोग्य स्थितीतील फरक जाणून घेता येणार आहे. याव्दारे पहिल्या सर्वेक्षणानंतर कोणाला काही त्रास झाला आहे काय, याची माहिती मिळणार आहे व तसे कोणी आढळल्यास त्याला आवश्यक ती वैद्यकीय मदत करणे व त्याचा फॉलोअप घेणे सोयीचे होणार आहे. त्यासोबतच घरातील एखाद्या व्यक्तीला ताप, खोकला, घशात खवखवणे, थकवा, श्वास घेण्यास त्रास अशाप्रकारचा त्रास होत आहे काय याचीही माहिती पुन्हा घेतली जाणार आहे. यामध्ये विशेषत्वाने ज्या व्यक्तींना मधुमेह, हृदयरोग, कर्करोग, किडनीचे आजार, अवयव प्रत्यारोपण, दमा अशा सहव्याधी (को-मॉर्बिडिटी) आहेत त्यांच्याकडे काळजीपूर्वक लक्ष दिले जाणार आहे. त्याचप्रमाणे नियमित मास्क लावणे, वारंवार हात धुणे, सॅनिटायझर वापरणे, सुरक्षित अंतर ठेवणे अशी कोरोनापासून बचाव करण्याची तंत्रे सांगितली जात असून त्यांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले जात आहे. तसेच आजाराची लक्षणे न लपवता आवश्यकता भासल्यास फिव्हर क्लिनिकमध्ये जाऊन तपासणी करणे, काही सहव्याधी (कोमॉर्बिडिटी) असल्यास नियमित औषधोपचार घेणे, एखादा कोरोनाबाधित बरा झाला असल्यास इतरांच्या आरोग्य हितासाठी त्यांना प्लाझमा डोनेशनसाठी प्रोत्साहित करणे अशा विविध प्रकारची माहिती देऊन पथकांमार्फत व्यापक स्वरूपात जनजागृतीही केली जात आहे. पहिल्या टप्प्यातील सर्वेक्षणात घेतलेली नागरिकांची माहिती महानगरपालिकेकडे उपलब्ध असल्याने दुस-या टप्प्यात त्या नागरिकांचे सद्यस्थितीतील शारीरिक तापमान व ऑक्सिजन पातळी मोजून अपमधील त्यांच्या नावासमोर नोंदविली जाणार आहे. त्यामुळे दुस-या टप्प्यातील सर्वेक्षणाकरिता या पथकांना दररोज ७५ ते १०० घरांचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. याशिवाय पहिल्या टप्प्यातील सर्वेक्षणात जी घरे बंद आढळली, ती घरे उघडी आढळल्यास त्या कुटुंबाचीही सर्वेक्षणात नोंद केली जाणार आहे.

'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' हे अभियान सर्व नागरिकांच्या आरोग्य स्थितीची पडताळणी करून त्यांना कोरोनाच्या या काहीशा दडपणाच्या वातावरणात आश्वस्त करणारे असून या सर्वेक्षणात केवळ कोरोनाविषयकच नाही तर इतरही आजारांसाठी आवश्यक ती वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यासाठी या पथकांमार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. नवी मुंबईकर नागरिक नेहमीच चांगल्या कामात सहकार्य करण्यासाठी आघाडीवर असतात. त्यानुसार 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यातही नवी मुंबईकर नागरिकांचे उत्तम सहकार्य लाभल्यानेच शासनाने दिलेल्या उद्दिष्टापेक्षा अधिक चांगली कामगिरी नवी मुंबई महानगरपालिका करू शकली असून आता दुस-या टप्प्यातील आरोग्य सर्वेक्षणासाठी घरोघरी येणा-या महानगरपालिकेच्या पथकांना नागरिकांनी संपूर्ण सहकार्य करावे असे आवाहन महापालिका आयुक्त श्री. अभिजीत बांगर यांनी केले आहे.

## मिरा भाईंदर महानगरपालिका
**प्रभाग कार्यालय क्र.१**

जा.क्र. मनपा/प्र.का.क्र.१/डी२१६/४७०/२०२०-२१ दिनांक :-३०/०९/२०२०

**// नोटीस //**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय क्र.१ क्षेत्रातील **न्यू आशीष, भाईंदर (प.)** येथील मालमत्ता क्रमांक **डी०३०००३०५२०१९** सदनिका क्र. २०४ असून या सदनिकेस **श्रीम. मधुबेन आर. पुराणी** या नावाची नोंद महानगरपालिका दफ्तरी नोंद आहे. परंतु मधुबेन आर. पुराणी यांचा दि.१४/१२/२०१९ रोजी मृत्यु झाल्यामुळे वारस या नात्याने त्यांचे पती/पत्नी/मुलगा/मुलगी/भाऊ **दीपक पुराणी/नीता पुराणी** यांनी लेखी अर्ज करून सदरची मालमत्ता दि.०१६/०३/२०२० रोजी हस्तांतरण करणेकरीता मागणी केलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील कलम १ (२) नुसार नावात बदल करणेबाबत प्रसिध्दी देण्यात येत आहे.

वरील मालमत्ता हस्तांतरणाबाबत कुणाचीही तक्रार व हरकत करावयाची झाल्यास **१४** दिवसांचे आत प्रभाग कार्यालय क्र. **१** येथे कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह कागदपत्र दाखल करावे मुदती नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

सही/-
प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र.१
मिरा भाईंदर महानगरपालिका

## मिरा भाईंदर महानगरपालिका
**प्रभाग कार्यालय क्र.१**

जा.क्र. मनपा/प्र.का.क्र.१/पी१०४/२८९५/२०१९-२० दिनांक :-२९/११/२०१९

**// नोटीस //**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय क्र.१ क्षेत्रातील डोंगरी विभागातील झोन क्र.पी०१ येथील मालमत्ता क्रमांक **पी०१००२५८०३०००/१३३०** सदनिका क्र... असून या **श्री डेव्हीड झुजीन दिनीस** या घरास सन २०१९-२० मध्ये **श्रीम. मनकीन कैतान पाटील** या नावाची नोंद महानगरपालिका दफ्तरी नोंद आहे. तरी वारस **नातु** या नात्याने **डेव्हीड झुजीन दिनीस** यांनी दिनांक: २५/०९/२०१९ रोजी लेखी अर्ज करून सदरची मालमत्ता हस्तांतरण करणेकरीता मागणी केलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील कलम १ (२) नुसार नावात बदल करणेबाबत प्रसिध्दी देण्यात येत आहे.

सदर मिळकती बाबतचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.
पूर्वेस - श्री जॉन्सन धारावी यांचे घर
पश्चिमेस - श्री सायमण कौलीधर यांचे घर
दक्षिणेस - श्री जेम्सी पाटील यांचे घर
उत्तरेस - श्री अंतोनी पाटील यांचे घर

वरील मालमत्ता हस्तांतरणाबाबत कुणाचीही तक्रार व हरकत करावयाची झाल्यास **१४** दिवसांचे आत प्रभाग कार्यालय क्र. **१** येथे कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह कागदपत्र दाखल करावे मुदती नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

सही/-
प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र.१
मिरा भाईंदर महानगरपालिका

## मिरा भाईंदर महानगरपालिका
**प्रभाग कार्यालय क्र.१**

**जा.क्र. मनपा/प्र.का.क्र.१/उत्तन ५४६/६४५/२०२०-२१ दिनांक :-१६/१०/२०२०**

**// नोटीस //**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय क्र.१ क्षेत्रातील क्षेत्रफल ३९२ फ्लॉट/शॉप ५०३, झोन क्र.टी येथील मालमत्ता क्रमांक **टी०१००२६९५१०००** असून **कोपरा उत्तन केशवसृष्टी रोड** या इमारतीस मध्ये **चार्ली मनवेल मेंडोंन्सा** या नावाची नोंद महानगरपालिका दफ्तरी नोंद आहे. तरी वारस **मुलगी** या नात्याने **रीम चार्ली मेंडोंन्सा** यांनी दिनांक: २५/२/२०२० रोजी लेखी अर्ज करून सदरची मालमत्ता हस्तांतरण करणेकरीता मागणी केलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील कलम १ (२) नुसार नावात बदल करणेबाबत प्रसिध्दी देण्यात येत आहे.

सदर मिळकती बाबतचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.
पूर्वेस - श्री सॅमसन ग्रेसीयस
पश्चिमेस - श्री रेजीना नुन
दक्षिणेस - श्री सेबेस्टीन मेंडोंन्सा
उत्तरेस - मोकळी जागा

वरील मालमत्ता हस्तांतरणाबाबत कुणाचीही तक्रार व हरकत करावयाची झाल्यास **१४** दिवसांचे आत प्रभाग कार्यालय क्र. **१** येथे कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह कागदपत्र दाखल करावे मुदती नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

सही/-
प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र.१
मिरा भाईंदर महानगरपालिका

## मिरा भाईंदर महानगरपालिका
**प्रभाग कार्यालय क्र.१**

**जा.क्र. मनपा/प्र.का.क्र.१/टी ५४५/६४६/२०२०-२१ दिनांक :-१६/१०/२०२०**

**// नोटीस //**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय क्र.१ क्षेत्रातील क्षेत्राफल ३०० फ्लॉट/शॉप ०१, झोन क्र.टी येथील मालमत्ता क्रमांक **टी०१००३४२६४०००** असून **उत्तन केशवसृष्टी** या इमारतीस मध्ये **चार्ली मनवेल मेंडोंन्सा** या नावाची नोंद महानगरपालिका दफ्तरी नोंद आहे. तरी वारस **पत्नी** या नात्याने **श्रीम. विल्मा चार्ली मेंडोंन्सा** यांनी दिनांक: २५/२/२०२० रोजी लेखी अर्ज करून सदरची मालमत्ता हस्तांतरण करणेकरीता मागणी केलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील कलम १ (२) नुसार नावात बदल करणेबाबत प्रसिध्दी देण्यात येत आहे.

सदर मिळकती बाबतचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.
पूर्वेस - श्री सॅमसन ग्रेसीयस
पश्चिमेस - श्री रेजीना नुन
दक्षिणेस - श्री सेबेस्टीन मेंडोंन्सा
उत्तरेस - मोकळी जागा

वरील मालमत्ता हस्तांतरणाबाबत कुणाचीही तक्रार व हरकत करावयाची झाल्यास **१४** दिवसांचे आत प्रभाग कार्यालय क्र. **१** येथे कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह कागदपत्र दाखल करावे मुदती नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

सही/-
प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र.१
मिरा भाईंदर महानगरपालिका

## पृष्ठ १ वरुन

### दीव, दमणवरुन महाराष्ट्रात

केंद्रशासित प्रदेशनिर्मित मद्याची अवैध वाहतूक नाशिक जिल्ह्यातून केली जात असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे. महाराष्ट्रात बंदी असलेली व दादरा नगर हवेली निर्मित बेकायदा मद्याची वाहतूक रोखण्यात राज्य उत्पादन शुल्क विभागास यश आले आहे. आठ दिवसात भरारी पथकाने तिसरी कारवाई केली आहे. पहिली कारवाई बुधवार, दि.१४ ऑक्टोबर रोजी रात्री स्कार्पिओच्या चोर कप्प्यात मद्याची वाहतूक करणाऱ्या गुजरातमधील दोघांना पथकाने हरसूल पेठ रोडवरील धानपाडा शिवारात अटक केली. त्याच्याकडून पथकाने स्कार्पिओसह सव्वाबारा लाखांची दारू जप्त केली. गुरुवार, दि.१५ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री दिंडोरी भरारी पथकाने पेठ ते नाशिक रोडवरील सावळघाट इनामबारी शिवारात सापळा रचून कारचालकाला अटक केली. त्याच्या ताब्यातून कारसह चार लाख ४ हजार ६४० रूपये किमतीचा मद्यसाठा जप्त केला. सोमवार, दि.१९ ऑक्टोबर रोजी विभागीय भरारी पथकाने हरसूलजवळ दोन कारमधून चौघांना अटक करत ४३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

### जिल्ह्यात ३,४९४ बालकांनी

होते. यामुळे निवड प्रक्रियेची वाट न बघता पालकांनी त्यांच्या परिने या शाळांमध्ये प्रवेश घेतले. मात्र, अनेक पालकांना विविध समस्या, शाळांकडून मार्गदर्शन न झाल्यामुळे मुलांचे प्रवेश घेता आलेले नाहीत. आजपर्यंत १३४ जणांना प्रवेश मिळाले आहेत. उर्वरित निवड झालेल्या १,७९२ मुलांचे पालक मार्गदर्शनाअभावी गोंधळलेले आहेत. त्यामुळे त्यांचे प्रवेश रखडले आहेत. यासाठी जूनमध्ये सोडतीद्वारे निवड झालेली आहे. प्रवेशाची शाळा प्रशासनाने एसएमएसद्वारे पालकांना कळवली आहे.तक्रार क्रमांक १-प्रवेश नाकारलेल्या बालकांच्या पालकांकडे उत्पन्नाचा दाखला नसल्यामुळे काही बालकांचे प्रवेश नाकारले आहेत.तक्रार क्रमांक २ -जातीचा दाखला नसल्यामुळेही प्रवेश नाकारले. परराज्यांतील जातीचे दाखले असल्याच्या कारणाखालीही प्रवेश दिला नाही.२३ ऑक्टोबरपर्यंत प्रवेश घ्या -प्रतीक्षायादीतील निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेश २३ तारखेपर्यंत दिलेल्या शाळेत पालकांनी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी मूळ कागदपत्रांच्या झेरॉक्ससह अलॉटमेंट लेटरची प्रत सोबत न्यावी. पालकांनी मुलांना शाळेत घेऊन जाऊ नये. - समिना शेख, शिक्षणाधिकारी (प्र.), जि.प. ठाणे

### घरफोडी करणाऱ्या सराईत

माहिती हवालदार बालाजी चव्हाण व संतोष मिसाळ यांना मिळाली होती.

त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक सुभाष निकम यांनी सहायक निरीक्षक राहुल राख, रुपेश नाईक, हर्षल कदम, हवालदार रोहिदास पाटील, बालाजी चव्हाण, शशिकांत जगदाळे, संतोष मिसाळ, धनाजी भांगरे व दिपक मोरे यांचे पथक करण्यात आले होते. या पथकाने रविवारी तुर्भे स्थानकाबाहेर सापळा रचला होता.यावेळी दोघेजण त्याठिकाणी एक गोणी घेऊन संशयास्पद वावरताना आढळून आले. यामुळे पथकाने त्यांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडील गोणीमध्ये चोरीचे मोबाईल व कपडे आढळून आले. तळोजा येथील उमेर अहमद बाऊद्दीन व कोपर खैरणेतील अविनाश कोरडे यांच्या दुकानातून त्यांनी हा माल चोरल्याची कबुली दिली. यानुसार त्यांच्याकडून १ लाख १७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलीस सह आयुक्त डॉ. बी. जी. शेखर यांनी दिली. त्यात ५२ मोबाईल, स्पीकर, हेडफोन तसेच कपड्यांचा समावेश आहे. याप्रकरणी त्यांना अटक करण्यात आली असून रिझवान खान (२८) व जावेद शेख (२२) अशी त्यांची नावे आहेत. तर त्यांचा तिसरा साथीदार फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. दोघेही कल्याण परिसरात राहणारे असल्याचे सह आयुक्त शेखर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. कोपर खैरत येथील अविनाश कोरडे यांनी कर्ज काढून नवीनच कपड्यांचा व्यवसाय सुरु केला होता. अशातच घरफोडी झाल्याने त्यांच्यावर संकट कोसळले होते. परंतु गुन्हे शाखा पोलिसांनी वेळीच या गुन्ह्याची उकल करून काही प्रमाणात चोरीचा मुद्देमाल जप्त केला आहे. अटक आरोपींकडून पाच गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यांच्यावर इतरही गुन्हे दाखल असून अधिक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

# मनोर पोलीस ठाणे यांचेकडून विनापरवाना शस्त्र बाळगणा-या आरोपीवर कारवाई

दिनांक १४/१०/२०२० रोजी सुमारे ००.४० वा.चे सुमारास मनोर पोलीस ठाणे हद्दीत मुंबई गाव मौजे हालोली पाडोसपाडा येथील समिरा हॉटेलचे समोर ता.जि.पालघर येथे काही इसम बेकायदेशीररित्या अग्नीशस्त्रे व काडतुसे विक्री करण्याच्या उद्देशाने येणार असल्याची बातमी गुप्त बातमीदारामार्फत मिळाली होती. सदर बातमीच्या आधारे सापळा रचुन आरोपी नामे सुशांत सुनिल सिनकर, वय-२५ वर्षे, रा.आनंद नगर, वसंत विहार, बी.विंग ४०२, दहिसर (पुर्व) मुंबई यांस ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता आरोपीकडुन खालील नमुद अग्नीशस्त्रे व काडतुसे विक्री करण्याच्या उद्देशाने स्वत:च्या कब्जात बाळगुन मिळुन आलेला आहे. १) १०,०००/-एक सिल्वर व तपकिरी रंगाचे देशी व गावठी बनावटीचे पिस्टल त्याचे मुठिस लाल रंग असलेला २)१०,०००/-एक काळया रंगाचे देशी व गावठी बनावटीचे पिस्टल ३) २०००/- ९ श्श् साईजचे ०८ जिवंत काडतुसे (राऊंड) ४)७००/-एक जांभळया रंगाचा नोकिया कंपनिचा मोबाईल हँडसेट असा एकुण २२,०००/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी यांचे विरुद्ध मनोर पोलीस ठाणे गु.र.नं. ाा १७६/२०२० भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,२५ (क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयातील आरोपी यास दि.१५/१०/२०२० रोजी ०४.५५ वाजता अटक करण्यात आली असुन आरोपी यांस ७ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुर झालेला आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास सपोनि श्री. श्रीकांत कोळी, मनोर पोलीस ठाणे हे करित आहेत. सदरची कारवाई श्री.विकास नाईक, उप विभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक श्री.प्रताप दराडे, प्रभारी अधिकारी, मनोर पोलीस ठाणे तसेच मनोर पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

# मनोर पोलीस ठाणे यांचेकडुन ज्वालाग्राही पदार्थ सोबत बाळगुन वाहतुक करणा-या आरोपी कारवाई

मा.पोलीस अधीक्षक, पालघर श्री.दत्तात्रय शिंदे यांनी महामार्गावर होणा-या जबरी चोरी, दरोडा, ऑइल चोरी, अवैद्य माल वाहतुक यासारख्या गुन्हयांना आळा घालण्याकरिता नियमित महामार्गावर पोलीस गस्त घालण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे मनोर ठाण्याचे पोलीस अधिकारी व कर्मचारी पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असतांना दिनांक १३/१०/२०२० रोजी २०.१५ वाजताचे सुमारास मौजे आवंढाणी गावचे हद्दीत अहमदाबाद-मुंबई महामार्गावर मुंबई वाहिनीलगत असलेल्या सती माता पॅलेस हॉटेल परीसरात यातील आरोपी क्र.१)मुकेश विरसिंग राऊत, वय २७ वर्षे, याने आरोपी क्र.२)विकास खत्री रा.बोईसर याचे सांगणेवरुन त्याचे ताब्यातील टेंम्पो क्र.एम.एच ०४/इ.एल.५४०८ यामध्ये बायो डीझेल ज्वलनशील पदार्थाचा साठा विक्री करण्यातकरीता विना परवाना आपले कब्जात बाळगुन व साठवणुक करुन मानवी जीवन धोक्यात येईल व ज्वालाग्राही पादार्थाबाबत हयगयीचे वर्तन करुन जिवणावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे तरतुदींचे उल्लंघन करुन वाहतुक करित असताना मिळुन आला. सदर गुन्हयातील आरोपी यांचे ताब्यातुन १) २८८००/- रुपये किंमतीचे एकुण ४५० लिटर डिझेल, २) ३३६००/- रुपये किंमतीचे एकुण ५२५ लिटर डिझेल, ३) १७२८०/- रुपये किंमतीचे एकुण २७० लिटर डिझेल, ४) ४४१६०/- रुपये किंमतीचे ६९० लिटर डिझेल, ५) ४६०८०/- रुपये किंमतीचे एकुण ७२० लिटर डिझेल, ६) १२८००/- रुपये किंमतीचे एकुण २०० लिटर डिझेल, ७) ६४००/- रुपये किंमतीचे एक सफ़ेद रंगाचा प्लॅस्टीकचा चौकोणी बॅरेल लोखंडी ब्रॅकेटमध्ये फिटींग केलेले ८) १०,०००/- रुपये किंमतीचे एक निळ्या व सफ़ेद रंगाची पंप मशिन, त्यास समोरील बाजुस चौकोणी डिस्ल्पे व त्याखाली किपॅड असलेला लोखंडी ब्रॅकेटमध्ये फिटींग केलेली ९) ५००/- एक सुमारे १८.५ फुट लांबीचा काळ्या रंगाचा रबरी पंप असा एकुण १,९९,६२०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन मनोर पोलीस ठाणे गु.र.नं.१७५/२०२० भा.द.वि.सं. कलम-२८५,३४ सह जिवनावश्य वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ७ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

सदरची कारवाई श्री.विकास नाईक, उपविभागिय पोलीस अधिकारी, पालघर विभाग, सपोनि/श्री.प्रताप दराडे, प्रभारी अधिकारी मनोर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली मनोर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी केली आहे.

## संपादकीय...



# निसर्गाचे संतुलन बिघडले अनाकलनीय हवामानामुळे शेतीचे तीनतेरा शेतकरी हवालदिल

कोरोना महामारीमुळे पृथ्वीच्या इतिहासात २०२० हे दुर्दैवी वर्ष म्हणून नोंदविले जात असताना निसर्गाच्या आगळ्या-वेगळ्या अवतारानेही लक्षात राहणार आहे. संपूर्ण पृथ्वीवरील मानवी समूहाच्या व्यवहारावर आणि जगण्याच्या आनंदावर विरजण टाकणाऱ्या या घटनांचा फटका सर्वच क्षेत्राला कमी-अधिक प्रमाणात बसला आहे. उद्योग, व्यापार, रोजगार, सेवा क्षेत्र, पर्यावरण, आरोग्य, शिक्षण आदी सर्वच क्षेत्रांवर गंभीर परिणाम होत आहे. अनेकांना मानसिकदृष्ट्याही भयावह त्रास सहन करावा लागतो आहे. शेतावर काम करणारा शेतकरी , असंघटित मजूर, रोजंदारीवरील



कामगार ते आयटी क्षेत्रातील अभियंते, तंत्रज्ञ, संशोधकांना जगण्यासाठी नव्या कल्पना आणि संधीचा शोध घेण्याची वेळ आली आहे. अशा पार्श्वभूमीवर आपल्या देशातील हवामानाने अनाकलनीय वळण याच महामारीच्या काळात घेतल्याचा मोठा फटका शेती- शेतकरी यांना बसला आहे.कोरोनाचा सर्वच क्षेत्राला नकारात्मक फटका बसला असताना केवळ अन् केवळ कृषी हे एकच क्षेत्र असे होते की, चालू वर्षातील हंगामात तुलनेने उत्तम पाऊस झाल्याने भारतीय जनतेला तारणहारच्या रूपात मदतीला येणार होते. भारत हा विविध संस्कृती, धर्म, भाषांचा देश आहे. तसाच तो विविध प्रकारच्या हवामानाचे स्तर असलेला आहे. परिणामी खरीप आणि रब्बी तसेच बारमाही पद्धतीच्या पिकांचा प्रदेश आहे. पिकांची विविधता खूप आहे. त्यानुसार विकसित झालेल्या खाद्यसंस्कृतीचाही जगण्याशी संबंध आहे. यासाठी कृषिक्षेत्राचे उत्पादन चांगले होणे महत्त्वाचे असते. पावसाळा चांगला झाला की, भारतीय अर्थव्यवस्थेला उभारी येते. कोरोनाचा प्रादुर्भाव असतानाही चालू हंगाम उत्तम जाणार, सरासरीपेक्षा थोडा अधिकच पाऊस होणार हा अंदाज होता. मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली तेव्हाच मान्सून वेळेवर आहे, अशी हाकाटी हवामान खात्याने दिली. शेतकऱ्यांनी गडबडीने पेरण्या केल्या आणि जुलै महिना कोरडा जाताच दुबार, तिबार पेरण्या कराव्या लागल्या. अनेक ठिकाणी बनावट बियाणांचा फटका बसला.ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये पावसाने सरासरी ओलांडली आणि कृषिक्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेचा तारणहार ठरणार असे वातावरण होते; पण हवामान खात्याचा अंदाज सरासरीपुरता खरा ठरत गेला असला तरी पाऊस कसा-कसा पडत राहील याचा अंदाज देऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात पुन्हा एकदा हे खाते नापास झाले. १२ नोव्हेंबर १९७७ रोजीचा इतिहासाचा दाखला देत 'लोकमत'ने वृत्तांत दिला, तोच खरा ठरला. तब्बल ४३ वर्षांनंतर बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाला. मागील दोन महिन्यांत उत्तम पाऊस झाल्याने ऑक्टोबर हिटने भरपूर बाष्प तयार झाले होते. त्यामुळे बंगालच्या उपसागरावर कमी दाबाच्या पट्ट्याने निर्माण झालेल्या वादळाचे घोंगावणे सुरू झाले. त्याचवेळी पश्चिमेच्या अरबी समुद्रात कमी दाब तयार होताच तेलंगणा, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक, गुजरात असा प्रवास करीत चक्रीवादळ पश्चिमेकडे सरकत राहिले. त्यातून गेल्या चार दिवसांत दररोज ठिकठिकाणी शंभर मिलिमीटरपेक्षा अधिक पाऊस होत राहिला आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर उत्तम पिकणाऱ्या शेतीचे पार वाटोळे झाले. उभी पिके पाण्यावर तरंगू लागली.सोयाबीन कुजू लागले, कापणीला आलेला भात झडू लागला. भाजीपाला, फळबागा कोसळू लागल्या. उभ्या पिकांचे होत्याचे नव्हते व्हायला वेळ लागला नाही. तारणहारच संकटात आला. अद्याप दोन दिवस हा पूर्व-पश्चिमेच्या दिशेने धावणाऱ्या चक्रीवादळाचा तडाखा कायम राहाणार, असा अंदाज आहे. हैदराबाद या ऐतिहासिक शहराच्या परिसरात केवळ दोन तासांत दोनशे मिलिमीटर पावसाची नोंद झाली. असा पाऊस गेल्या शंभर वर्षांत झाला नव्हता. मनुष्यहानीबरोबरच कृषिक्षेत्राचे अतोनात नुकसान झाले. आता तरी केंद्र सरकारने हवामान खात्याकडील तंत्रज्ञानाचा वापर योग्य पद्धतीने करून पावसाचा अंदाज अचूक वर्तविला पाहिजे. असे झाले असते तर हैदराबाद शहरातील संपत्तीचे मोठे नुकसान टाळण्यास मदत झाली असती. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बसलेला हा तडाखाही एक दुर्दैवी घटना म्हणून नमूद करावे लागणार आहे.

# लोकशाहीचा आत्मघात!

## लोकशाहीच्या कडबोळ्यापेक्षा एकटाच कोणी खमका बरा, ही भावना किती धोकादायक आहे हे थायलंडसारख्या देशात सध्या जे सुरू आहे त्यातून समजून घेता येईल..

अमेरिकेतील निवडणुका, युरोपातील करोना-साथ आदी महत्त्वाच्या घटनांच्या भाऊगर्दीत आपल्या कोपऱ्यावरील थायलंड देशातील अनागोंदी काहीशी दुर्लक्षित राहिल्याचे दिसते. पलीकडच्या हाँगकाँगमधील घटनांच्या निमित्ताने चीनचा वेध घेता येतो. खुद्द चीन हाच मोठा बातम्यांचा विषय राहिलेला आहे. म्यानमारसारख्या देशात रोहिंग्या मुसलमान आणि ऑंग सान स्यु की यांचे लबाड राजकारण हे विषय वृत्तवेधी राहिलेले आहेत. बांगलादेश, श्रीलंका या देशांचे त्यांचे त्यांचे काही भूराजकीय, सामरिक असे महत्त्व आहे. त्या मानाने थायलंड हा देश तसा वृत्तदृष्टय़ा दुर्लक्षितच. पर्यटन आणि मौजमजा यांच्याशीच थायलंड जोडला गेलेला असल्यानेही असेल, पण त्या देशातील इतक्या महत्त्वाच्या घटनांकडे आपल्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही, हे खरे. सध्या त्या देशात जे काही सुरू आहे ते पारंपरिक समाजात आधुनिक लोकशाही मूल्ये रुजवणे ही किती प्रदीर्घ प्रक्रिया आहे याचे निदर्शक असल्याने समजून घेणे आवश्यक ठरते.

या देशात राजा आहे. तो असूनही लोकशाही आहे. राजाच्या आशीर्वादाने काम करू पाहणारा पंतप्रधान आहे आणि त्या आशीर्वादाच्या बदल्यात राजाच्या कृष्णकृत्यांकडे दुर्लक्ष करण्याची त्याची तयारी आहे. आणि ही कृष्णकृत्ये तरी काय? तर पैशाची प्रचंड अफरातफर आणि त्याच्या आधारे सततचा सुरू असलेला लैंगिक विकृतोत्सव. त्यातही हास्यास्पद भाग म्हणजे, विद्यमान राजा महा वजीरालोंगकोर्न हा आपल्या प्रजेबरोबर राहायला तयार नाही. तो राहतो जर्मनीत. आपल्या लग्नाच्या बायका आणि २० ललनांचा रंगमहाल यांच्यासमवेत. त्यांच्या तेथे राहण्याची आणि जीवनशैलीची खरे तर जर्मनीसही लाज वाटते. 'मोटारसायकली उडवणे, खाणे आणि संग करणे या तीन गोष्टींतच थायलंडच्या महाराजांना रस आहे,' असे जर्मन अधिकाऱ्याचे अलीकडचे वक्तव्य. या महाराजा महा वजीरालोंगकोर्न यांच्या चार पत्नी होऊन गेल्या. त्यांपासून झालेल्या आपल्या अपत्यांनाच हे महाराज ओळख नाकारतात. अलीकडेच एका महिला विमान कर्मचारीस या महाराजाने अधिकृत अंगवस्त्रचा दर्जा देऊन सर्वानाच ओशाळे केले. आपल्या जन्मदिनी आपल्या एका पत्नीकडून नग्नावस्थेत रांगत जन्मदिनाचा केक कापून घेणारा



आणि त्याची अशी चित्रफीत काढण्याइतका हा महाराज विकृत आहे. आणि इतके करून त्यांनी या 'राणी'स हाकलूनच दिले, ही बाब अलाहिदा. खरे तर यांचे वडील भूमीबोन अदुल्यादेज हे त्या देशातील त्यातल्या त्यात आदरणीय व्यक्तिमत्त्व. त्यांचा जन्मदिन थायलंडमध्ये पितृदिन म्हणून ओळखला जातो. ते हयात होते तोपर्यंत त्या देशातील नागरिकांना राजेशाही कधीही तापदायक वाटली नाही. वास्तविक हे भूमीबोन हे सौदी राजघराण्यापेक्षाही अधिक ऐश्वर्यसंपन्न होते. पण त्याचे विकृत प्रदर्शन त्यांनी केले नाही. त्यांचे चिरंजीव वजीरालोंगकोर्न हे गादीवर आले आणि सर्वच धरबंध सुटले. थायलंडवासीयांच्या अपेक्षाभंगास सुरुवात झाली. वास्तविक विद्यमान राजे हे पाश्चात्त्य विद्याविभूषित. तीर्थरूपांनी जगातील उत्तमोत्तम विद्यापीठांतून त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. इतकेच नव्हे तर ते युद्धकलेतही पारंगत. ऑस्ट्रेलिया, युरोपातील उच्च दर्जाच्या लष्करी विद्यापीठांतूनही त्यांनी शिक्षण घेतले. त्याचमुळे हे महाराज एकाच वेळी एअर चीफ मार्शल, जनरल आणि ॲडमिरल म्हणजे हवाई दल, भूदल आणि नौदल अशा तीनही सेनांचे प्रमुख आहेत. त्या देशाची सैन्यदले ही पंतप्रधानापेक्षा राजघराण्याशी अधिक निष्ठावान असतात. त्यामुळे कागदोपत्री लोकशाही असली तरी राजा, लष्कर आणि सत्ता हे त्रराशिक त्या देशात नेहमीच दोलायमान राहिलेले आहे.

जोपर्यंत भूमीबोन गादीवर होते आणि पंतप्रधानपदी थकसिन सिनावात यांच्यासारखी जनाधार असलेली व्यक्ती होती तोपर्यंत सारे काही सुरळीत होते. जी काही नाराजी निर्माण होत असे तीस सनदशीर मार्गांनी वाट करून दिली जात असे. पण २०१६ साली भूमीबोन यांच्यानंतर हे विद्यमान राजे गादीवर आले आणि सारेच चित्र बदलले. पुढच्याच वर्षी त्यांनी सर्व सरकारी संपत्तीवर ताबा मिळवला. त्या देशात अनेक खासगी उद्योगांतही सरकारी मालकी आहे.. सरकारी म्हणजे राजाच्या वतीने झालेली.. त्याचा पुरेपूर फायदा या जर्मन-स्थित थायी महाराजांनी घेतला. त्यामुळे आता सरकारी महसुलाचा मोठा वाटा त्यांच्या मौजमजेवर खर्च होतो. त्यातूनच लिबियाच्या कर्नल मुअम्मर गडाफीप्रमाणे ते स्वत:साठी फक्त महिला शरीररक्षकांची तुकडी तैनात करू शकतात. त्यात परत थायी घटनेनुसार सरकारी महसुलाचा काही ठरावीक वाटा हा राजाच्या चरणी वाहावा लागतो. आधीच आर्थिक संकट अनुभवणारी थायी जनता राजाच्या या मौजमजेवर संतापली असेल तर त्यात काही गैर नाही. गेली दोन वर्षे हा राजा अधिकाधिक अधिकार आपल्या हाती घेऊ लागला आणि पंतप्रधान प्रयुथ चान-ओचा हे त्याच्या हातचे बाहुले बनत गेले.

ही परस्पर सोयीची व्यवस्था. निकम्म्या पंतप्रधानास बदमाश राजसत्तेचा आधार. त्यामुळे सर्व निर्णयप्रक्रिया ही या दोघांपुरतीच कल्याणकारी. वास्तविक हे पंतप्रधान प्रयुथ हे एके काळचे लष्करी अधिकारी. त्यांनी काही वर्षांपूर्वीच राजसत्तेविरोधात बंड छेडले. त्या वेळी अनेकांच्या त्यांच्याकडून अपेक्षा होत्या. त्यानंतर त्यांनी राजसत्ता हस्तगत केली. क्रांतीमार्गे सत्ता हस्तगत करणारे अंतत: ज्याच्याविरोधात क्रांती केली त्याच्यासारखेच वागू लागतात. हा जगाचा इतिहास आहे. त्याचीच पुनरावृत्ती थायलंडमध्ये घडत गेली आणि या विकृत सोयीच्या राजकारणातून लोकशाहीचा संकोच होत गेला. गेल्या जुलै महिन्यापासून याबाबत अस्वस्थता होती. पण करोनाच्या निमित्ताने राजसत्तेने तीस वाचा फुटू दिली नाही. पण त्या विषाणूचे भय कमी झाल्यावर जनता पुन्हा संघटित होऊ लागली आणि बँकॉक आदी शहरांत तिचा उद्रेक होऊ लागला. तसे तो होण्यामागील आणखी एक कारण म्हणजे राजेशाहीविरोधात नाराजीदेखील व्यक्त करण्यास सरकारने घातलेली मनाई. राजसत्तेची साधी टिंगल जरी केली तरी तो देशद्रोहाचा गुन्हा मानला जाईल असा फतवा सरकारने काढला. इतकेच नाही, तर त्याची अंमलबजावणीदेखील सुरू झाली. परिणामी राजाचा निषेध करणाऱ्या तरुणांच्या टोळक्यांस जेरबंद करण्याचा प्रयत्न झाला. यामुळे तरुणाईचा उद्रेक अधिकच तीव्र झाला नसता तर नवल. आर्थिक आघाडीवर पूर्ण अपयश, त्यामुळे आटलेल्या रोजगार संधी, बेरोजगारांचे वाढते तांडे, या अवस्थेतही छानछोकीत राहणारे सत्ताधीश आणि या सगळ्यावर मुस्कटदाबी. इतके स्फोटक रसायन मिळाल्यावर जनतेचा उद्रेक होणारच. तसाच तो सध्या थायलंडमध्ये पाहायला मिळतो. वर त्या देशाची अडचण म्हणजे पंतप्रधानाकडे कोणताही राजकीय अधिकार नाही आणि ज्याच्या नावे तो राज्य करतो त्या राजास नैतिकता म्हणजे काय हेच माहीत नाही. अशा परिस्थितीत त्या देशातील आगडोंब शांत करणार कोण आणि कसा हा प्रश्न आहे.हे सर्व बरेच काही शिकवणारे आहे. आशिया खंडातील, तिसऱ्या जगातील अनेक देशांत अद्यापही राजेशाहीविषयी वा एकचालकानुवर्तित्वाविषयी सुप्त आकर्षण आहे. लोकशाहीच्या कडबोळ्यापेक्षा एकटाच कोणी खमका बरा, अशी बालिश भावना अनेकांच्या मनी अजूनही दिसते. ती किती धोकादायक आहे हे थायलंडसारख्या कोवळ्या लोकशाही देशातून समजून घेता येईल. अमेरिकेचे दुसरे अध्यक्ष जॉन ॲडम्स म्हणाले होते त्याप्रमाणे, राजेशाहीच्या तुलनेत लोकशाहीची लवकर दमछाक होते आणि तीस आत्मघाताचा धोका असतो. हे खरेच. तो टाळण्याचे महत्त्व थायलंडमधील तरुणाईने जाणले ही बाब कौतुकास्पद.

# दोन बहिणींचे अपहरण करून सामूहिक बलात्कार, बेशुद्ध अवस्थेत डोंगराळ परिसरात आढळल्या दोघी

देशातील हाथरस प्रकरणाबद्दल लोकांमध्ये आधीच संताप आहे, परंतु सामूहिक बलात्काराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. एकीकडे उत्तर प्रदेश पोलिसांनी केलेल्या रातोरात अंत्यसंस्कारामुळे देशाचे लक्ष वेधून घेतले गेले, तर राजस्थान पोलिसांनीही पीडित मुलींना चांगली वागणूक दिलेली नाही. राजस्थान येथे जालोरच्या भीनमाल ठाणे परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. या ठिकाणी सहा तरूणांनी एका गावातील दोन अल्पवयीन बहिणींना निर्जन असलेल्या डोंगराळ परिसरात नेले आणि तिथे त्यांच्यावर सामूहिक बलात्कार केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. सामूहिक बलात्कारानंतर आरोपींनी दोघींना जसवंतपुरा पोलीस ठाणे हद्दीतील राजपुरा येथील डोंगराळ परिसरात बेशुद्ध अवस्थेत सोडून पळ



काढला.स्थानिकांना याबाबत माहिती मिळाताच त्यांनी पोलिसांना माहिती दिली.

त्यानंतर घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांकडूनही या मुलींना योग्य वागणूक मिळाल नसल्याचे सांगितले जात आहे. जखमी झालेल्या आणि वेदनने विव्हळत असलेल्या त्या दोघींसाठी रुग्णवाहिका देखील उपलब्ध झाली नाही. अखेर त्यांना एका रिक्षातून रुग्णालयात दाखल करण्यात आले. या दोघींपैकी एकीची प्रकृती गंभीर असल्याचे माहिती मिळत आहे. अन्य फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक रवाना झाले आहे. आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.भीनमाल भागातील एका गावात तरुणांनी घरात झोपलेल्या दोन अल्पवयीन चुलत बहिणींचे अपहरण केले आणि त्यांच्यावर बलात्कार केला. नंतर मुली राजपुराच्या डोंगरावर फेकून देऊन आरोपी फरार झाले. रात्री थंडीमुळे दोन्ही मुलींची प्रकृती अधिकच खराब झाली, त्यांचे पालक रात्रीभर मुलींचा शोध घेत राहिले. पोलिसांनी सांगितले की, आरोपींविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी चारही आरोपींना शोधण्यासाठी चार पथके तयार केली आहेत. रविवारी सकाळी दोन्ही मुलींवर बलात्कार झाल्याची माहिती देण्यात आल्याबाबत पोलिसांनी सांगितले.

# तलासरी पोलीस ठाणे यांचेकडुन अवैद्य दारु वाहतुक करणा-या आरोपीवर कारवाई

दिनांक-१४/१०/२०२० रोजी ०४.३० वाजता तलासरी पोलीस ठाणे हद्दीत मुंबई अहमदाबाद हायवे रोडच्या मुंबई वाहीणीवर ता.तलासरी, जि.पालघर येथे आरोपी विजय रणजित धोडी, वय-२५ वर्षे, रा.मलाव पारशीपाडा, ता.उबंरगाव जि.वलसाड राज्य-गुजरात याने त्याने ताब्यातील कार नं. एम. एच. ०३ ए. एम. ५६३६ ही चालवुन घेवुन येत असतांना पोलिसांनी थांबण्याचा इशारा केला असता कार न थांबवता मुंबई बाडुकडे भरधाव वेगात घेवुन पळुन गेला. सदर कारचा पाठलाग करुन त्यास पकडुन वाहनाची तपासणी केली असता त्याचे ताब्यातील वाहनात विनापरवाना महाराष्ट्रात बंदी असलेल्या प्रोव्हिविशन गुन्हाचा माल वाहतुक करीत असतांना मिळुण आला. सदर आरोपी यांचे ताब्यातुन १)४७,४५०/- इंपरियल ब्ल्यु कंपनिच्या १८० मीलीच्या एकुण ७३० काचेच्या सिलबंद बाटल्या एका बाटलीची किंमत ६५ रुपये त्यावर इंग्रजित सेल फॉर ओन्ली दादरा नगर हवेली असे लिहलेले. २)२,००,०००/-रुपये किंमतीचा एक सफेद रंगाची मारुती एस.एक्स.४ कार नं. एम.एच.०३ ए.एम.५६३६ असा एकुण २,४७,४५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचे आरोपी यांचेविरुद्ध तलासरी पोलीस ठाणे गुन्हा गु.र.जि. क्र.२२३/२०२० महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (अ) (इ), सह. मो. वा. का. कलम १८४,१३०/१७७,१३२/१७७ प्रमाणे, दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्री.वसावे, प्रभारी अधिकारी तलासरी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तलासरी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी केली आहे.

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**
**COMPUTER DEPARTMENT**
Indira Gandhi Bhavan, Chattrapati Shivaji Maharaj Marg, Bhayander (W) -401101
Tal.Dist. Thane 401101

MBMC/COMPUTER/ 189 /2020-21

Date: 16 / 10 / 2020

**// Tender Notice //**

Mira Bhaindar Municipal Corporation invites sealed tenders for following works. The tenders form and other relevant document will be available for download on MBMC E-Tendering website as https://gem.gov.in from Dt.16/10/2020 to Dt.26/10/2020 till 5.00 p.m. Tender form fee and EMD should be submitted through online Receipt system, failing which the tender will be disqualified.

The last date for submission of tenders computed in all respects on Dt.26/10/2020 up to 5.00 p.m. in the above mentioned website. If possible the tenders shall be opened in the presence of their bidders or, there representative on the Dt.26/10/2020 after 5.00 p.m. at the Tender cell of Mira Bhainder Municipal Corporation.

Hon. Commissioner of Mira Bhainder Municipal Corporation has reserve right to reject any or all online bids, without assigning any reasons.

| Sr. No. | Name of work | Estimated Amount in Rs |
|---|---|---|
| 1) | Supply of Computers and Barcode Scanner Machine for Covid 19 to MBMC Health departments | Rs.5,00,000/- |

**Note :-**

1.Tender Documents shall not be sent or received via post.
2.Tender Submission is online only.

जा. क्र. मनपा / जनसम्पर्क / १५२/२०२०-२१
दि. १६/१०/२०२०

Sign/-
(R.M.Gharat)
System Manager
MBMC

# कोरोनामध्ये ८५ हजार बेरोजगारांना रोजगार




कोरोनाच्या संकटामुळे बेरोजगारीची समस्या निर्माण झाली आहे. कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागाने लॉकडाऊनच्या काळात जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये आयोजित केलेले ऑनलाईन रोजगार मेळावे तसेच महास्वयंम वेबपोर्टलमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांच्या आधारे ८५ हजार ४२८ इतक्या बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे, अशी माहिती विभागाचे मंत्री नवाब मलिक यांनी दिली.

बेरोजगार उमेदवार आणि उद्योजक यांच्यामध्ये सांगड घालण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागाने वेबपोर्टल सुरु केले आहे. तसेच लॉकडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात आयोजित रोजगार मेळाव्यांमुळे राज्यातील ८५ हजार ४२८ बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झाला. 'रोजगार महास्वयंम' या पोर्टलवर सप्टेंबरमध्ये ६३ हजार ५९३ इतक्या इच्छूक उमेदवारांनी नोकरीसाठी नवीन नोंदणी किंवा पुनर्नोंदणी केली. यात मुंबई विभागात २७ हजार २५२, नाशिक विभागात ६ हजार ६४४, पुणे विभागात ११ हजार ६८१, औरंगाबाद विभागात ९ हजार १६१, अमरावती विभागात ५ हजार ००९ तर नागपूर विभागात ३ हजार ८४६ बेरोजगार उमेदवारांनी नोंदणी केली. कौशल्य विकास विभागाच्या विविध उपक्रमांद्वारे सप्टेंबरमध्ये ३२ हजार ९६९ उमेदवारांना नोकरी मिळाली. यामध्ये मुंबई विभागात सर्वाधिक २० हजार ८०५, नाशिक विभागात २ हजार २४४, पुणे विभागात ४ हजार १८७, औरंगाबाद विभागात ३ हजार १२८, अमरावती विभागात १ हजार २९३ तर नागपूर विभागात १ हजार ३१२ इतके बेरोजगार उमेदवारांना नोकरी मिळाली. सप्टेंबरमध्ये ३२ हजार ९६९ बेरोजगारांना रोजगार मिळाला. जानेवारी ते सप्टेंबरदरम्यान १ लाख १७ हजार ८४३ बेरोजगारांना रोजगार मिळाला, अशी माहिती मंत्री मलिक यांनी दिली.

**लॉकडाऊनमध्ये १११ रोजगार मेळावे**

कौशल्य विकास विभागाने लॉकडाऊनच्या काळात राज्यभरात पंडित दीनदयाळ उपाध्याय ऑनलाईन रोजगार मेळाव्यांची मोहीम सुरु केली आहे. एप्रिल ते सप्टेंबरमध्ये १११ ऑनलाईन रोजगार मेळावे झाले. सप्टेंबरमधील ३५ मेळाव्यांमध्ये २३६ उद्योजकांनी सहभागी झाले. त्यांच्याकडील १६ हजार ६८३ जागांसाठी त्यांनी व्हॉट्सअ‍ॅप, स्काईप, झूम अ‍ॅपच्या सहायाने ऑनलाईन मुलाखती घेतल्या. या मेळाव्यांमध्ये ९ हजार ८५६ नोकरीइच्छूक तरुणांनी सहभाग घेतला. त्यापैकी आतापर्यंत ३ हजार ९३६ तरुणांना रोजगार मिळाला आहे. उर्वरित जागांसाठी तरुणांमधून निवड प्रक्रिया सुरु आहे. तरुणांनी नोंदणी करण्याचे आवाहन

रोजगार उपलब्धतेसाठी तरुणांनी वेबपोर्टलवर मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी आणि आधार क्रमांकासह नोंदणी करावी. आधी नोंदणी केलेल्या उमेदवारांनी आपली माहिती अद्ययावत करावी, तसेच कुशल उमेदवारांच्या शोधात असलेले खासगी, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योजक, कॉर्पोरेट्स यांनीही या वेबपोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन नवाब मलिक यांनी केले आहे.

# सात महिन्यांनंतर मोनो-मेट्रो धावली



कोरोनाच्या संकटामुळे ठप्प झालेली मेट्रो सेवा आज सकाळपासूनच मुंबईकरांच्या सेवेत आली आहे. तर मोनोरेलच्या सेवेला रविवारपासून सुरूवात झालेली आहे. अनलॉकच्या टप्प्यात मेट्रो मोनोची सेवा सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला, पण या सेवांसाठी काही नियम आणि अटींनुसारच प्रवास करता येणार आहे. सोशल डिस्टन्सिंगच्या नियमामुळे काही ठराविक प्रवासीसंख्येसह या सेवेसाठी परवानगी देण्यात आली आहे. मुंबईत सकाळी ८.३० ते रात्री ८.३० या कालावधीतच मेट्रो सेवा चालवली जाणार आहे. सोशल डिस्टन्सिंगच्या नियमामुळे ३०० ते ३५० जणांनाच मेट्रोने प्रवास करण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामध्ये १०० प्रवाशांना बसून प्रवासाची तर १६० प्रवाशांना उभे राहून प्रवास करता येणार आहे. एका डब्यात ६० ते ६५ प्रवाशांनाच प्रवास करता येईल. तर प्रत्येक प्रवाशाला एक सीट सोडूनच बसावे लागेल. तशी व्यवस्थाच मेट्रो प्रशासनाकडून करण्यात आली आहे. कोरोनाच्या आधी मेट्रोच्या ४०० फेऱ्या व्हायच्या. गेल्या ६५ महिन्यामध्ये ६० कोटी लोकांनी मेट्रोने प्रवास केला आहे. कोरोनाच्या संकटामुळे मेट्रो सेवा मार्च ते ऑक्टोबर अशी पुर्ण सात महिने बंद होती.

**टोकन बंद**

मेट्रो प्रवासासाठीचे टोकन कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बंद करण्यात येणार आहे. टोकन एवजी क्यूआर कोड आणि कागदाचे तिकिट देण्यात येणार आहे. स्मार्ट आयडी आणि मोबाईल एपद्वारेही मेट्रोचे तिकिट देण्यात येणार आहे. मुंबईत कोरोनाचे संकट पाहता अवघ्या २०० ट्रिप होत आहेत. कोरोनाच्या नियमानुसारच मेट्रो सेवेच्या प्रत्येक ट्रिपनंतर मेट्रो सॅनिटाईज करण्यात येणार आहे. कोरोना व्हायरसचे संक्रमण जोवर संपत नाही तोवर कोरोनाच्या नियमानुसार सॅनिटायजेशन करण्यात येणार आहे.

# पाण्याच्या पाईपलाईनची दुरुस्ती करताना २ कर्मचाऱ्यांचा विजेच्या धक्क्याने मृत्यू; ५ जण जखमी



मुंबईतील कुर्ला परिसरातील सुमननगरजवळ मेट्रोचे काम सुरू आहे. यावेळी पाईपलाईनच काम सुरू असताना पालिकेच्या ७ कर्मचाऱ्यांना वीजेचा धक्का लागला. तर दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत ५ कर्मचारी जखमी झाले आहे. जखमींना राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

**असा घडला प्रकार**

मुंबईतील कुर्ला परिसरातील सुमननगरजवळ मेट्रोचे काम सुरू आहे. या भागात पाण्याची पाईपलाईन फुटली होती. या पाईपलाईनच्या दुरुस्तीच काम सुरू होते. आज सकाळी ८ वाजेच्या सुमारास काम करण्यासाठी कर्मचारी पोहोचले होते. तेव्हा अचानक ७ कर्मचाऱ्यांना विजेचा धक्का बसला. यात २ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. तर इतर ५ जण हे यातून थोडक्यात बचावले असल्याची माहिती समोर येत आहे.

या दुर्घटनेत गणेश दत्तू (४५) आणि अमोल काळे (४०) या २ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. जर इतर ५ जण जखमी झाले आहे. नाना पुकळे (४१), महेश जाधव (४०), राकेश जाधव (३९) अनिल चव्हाण (४३), नरेश अधांगळे (४०) अशी जखमींची नावे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जखमींना राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहे. त्यांची प्रकृती स्थिर आहे.

# खाकी'तील समाजभान! गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पोलिसाचा पुढाकार, नोकरी सांभाळून देतोय शिक्षण



देशातील कोरोनाग्रस्तांच्या संख्येने तब्बल ७५ लाखांचा टप्पा पार केला आहे. कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी देशात शाळा-महाविद्यालये बंद असून ऑनलाईन क्लासेसवर अधिक भर दिला जात आहे. अनेक ठिकाणी ऑनलाईन पद्धतीने शिक्षण सुरू करण्यात आले आहे. मात्र स्मार्टफोन, इंटरनेट कनेक्शन नसल्यामुळे अनेक विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहत आहेत. त्यांना शिक्षण घेताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मुलांचं शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी एका पोलिसाने पुढाकार घेतला आहे. थान सिंह असं या पोलिसाचं नाव असून ते दिल्ली पोलीस दलात कार्यरत आहेत. गरीब मुलांना ते शिकवतात. दिल्लीच्या लाल किल्ल्याजवळ असलेल्या साई मंदिरात त्यांचे वर्ग भरत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, लॉकडाऊनमुळे काही विद्यार्थ्यांना शिकवणी बंद करावी लागली होती. गरीब घरातून येणाऱ्या अनेक मुलांकडे स्मार्टफोन, संगणक आणि इंटरनेटच्या सुविधा नाहीत त्यामुळे ते ऑनलाईन क्लासमध्ये सहभागी होऊ शकत नाहीत. म्हणूनच थान सिंह यांनी विद्यार्थ्यांना शिकवण्याचा निर्णय घेतला. खूप आधीपासून विद्यार्थ्यांचे क्लास घेत आहे.

मात्र कोरोना संक्रमणामुळे मुलांच्या सुरक्षेसाठी क्लास घेणं बंद केलं होतं. पण अनेक विद्यार्थी ऑनलाईन क्लास करू सकत नाहीत. कारण त्यांच्याजवळ फोन आणि संगणकासारख्या गोष्टी नाहीत तेव्हा मी पुन्हा एकदा क्लास सुरू करण्याचा निर्णय घेतला अशी माहिती थान सिंह यांनी एएनआय शी बोलताना दिली आहे. पोलिसाने दिला मदतीचा हात, घेतली विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारीआरोग्य मंत्रालयाकडून जारी करण्यात आलेल्या गाईडलाईन्सचं पालन करत हे क्लास घेण्यात येत आहेत. मुलांना वर्गात मास्क आणि सॅनिटायझरही उपलब्ध करून दिलं जातं. वर्गात सोशल डिस्टन्सिंग पाळून मुलांचं शिक्षण सुरू असल्याची देखील माहिती दिली आहे.

एका हिंदी वेबसाईटने याबाबतचे वृत्त दिले आहे. कोरोनाच्या संकटात एका शिक्षकाने विद्यार्थ्यांसाठी घरासमोर ;शाळा आणली आहे. मुलांसाठी त्यांनी मोहल्ला क्लासेस सुरू केले असून मुलांना त्यांच्या घराजवळ जाऊन शिकवत आहेत.

आपल्या बाईकला एक ब्लॅकबोर्ड लावून ते प्रवास करतात आणि विद्यार्थ्यांना शिकवत असल्याची माहिती मिळत आहे. रुद्र राणा असं या शिक्षकाचं नाव असून ते छत्तीसगडमधील कोरिया जिल्ह्यातील एका सरकारी शाळेचे शिक्षक आहेत. कडक सॅल्यूट! मजुरांच्या मुलांवर मजुरीची वेळ येऊ नये म्हणून शिक्षणासाठी पोलिसाचा पुढाकारकोरोनाच्या संकटात पोलीस आपल्या कुटुंबीयांपासून दूर राहून आपलं कर्तव्य पार पाडत आहेत. लोकांच्या सेवेसाठी अहोरात्र काम करत आहेत.

विद्यार्थ्यांचं शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी पोलीस अधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला आहे. शांथप्पा जीदमनव्वर असं या पोलीस अधिकाऱ्याचं नाव आहे. कर्नाटकच्या बंगळुरूमधील अन्नपूर्णेश्वरी नगर परिसरात पोलीस उप-निरीक्षक शांथप्पा हे मजुरांच्या मुलांना मोफत शिकवत आहेत. ज्या मुलांकडे स्मार्टफोन, लॅपटॉप नाही अशा विद्यार्थ्यांना ते वेळात वेळ काढून शिकवतात.

# सरसकट महिलांना लोकल प्रवासाची मुभा कधी ?



मुंबई : मागील दोन दिवसांमध्ये जवळपास सहा महिन्यांच्या प्रतिक्षेनंतर मेट्रो आणि मोनो रेल अशा दोन्ही सार्वजनिक प्रवासाच्या सुविधा मुंबईकरांच्या सेवेत रुजू झाल्या. त्यानंतर आता धीम्या गतीनं रुळावर येणाऱ्या मुंबईच्या लोकल सेवेला गती कधी मिळणार हाच प्रश्न उपस्थित होत आहे. यातच आता अतिशय महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

सरसकट महिलांसाठी लोकल सेवा सुरू होण्या संदर्भातील निर्णय येत्या दोन दिवसांत होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महिलांसाठी १७ ऑक्टोबरपासून सर्व महिलांना लोकलमधून प्रवास करण्याची परवानगी देण्याबाबत राज्य सरकारने रेल्वेला पत्र लिहलं होतं.

रेल्वे बोर्डाकडून परवानगी आणि प्रवाशी संख्या किती राहील या बाबत चर्चा करून निर्णय घेऊ याबाबत पश्चिम रेल्वेने आपत्ती व्यवस्थापन सचिव किशोरराजे निंबाळकर यांना पत्र पाठवलं होतं. त्याचसंदर्भात सोमवारी रेल्वे आणि राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांची चर्चा होऊन महिलांसाठी लोकल सुरू होण्याचा निर्णय येत्या दोन दिवसांत येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, सरसकट सर्व महिलांसाठी रेल्वे सेवा सुरु करण्याच्या निर्णयामध्ये दिरंगाई होत असल्यामुळं महिला वर्गात नाराजी पाहायला मिळत आहे. रेल्वे प्रवासासाठी मोर्चे काढू तसेच रस्त्यावर उतरु, असा इशारा महिला प्रवाशांनी दिला आहे. बस आणि रिक्षाने प्रवासात अधिक पैसे मोजावे लागतात असं सांगत केंद्रानंही आता लवकरात लवकर सर्वसामान्य महिलांसाठी रेल्वे प्रवास सुरु करावा, अशी मागणीही जोर धरु लागली आहे.

# रस्ते अपघात झाल्यास होणार मोफत उपचार; राज्य सरकारचा निर्णय




राज्यात रस्ते अपघातग्रस्त रुग्णांना तत्पर (उदत्ह प्दले) मध्ये वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना सांपूर्ण राज्यात राबववण्यास राज्य सरकारकडून मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे यापुढे ठराविक कालावधीत रस्ते अपघातातील रुग्णांवर मोफक उपचार केले जाणार आहेत. सप्टेंबर महिन्यात महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळ बैठकीत स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेला मंजूरी देण्यात आली होती. या योजनेतून राज्यातील रस्त्यांवर होणाऱ्या अपघातातील जखमींना लाभ मिळणार आहे. मुख्य म्हणजे ही व्यक्ती अन्य राज्य तसेच देशातील कुठल्याही भागातील असली तरीही महाराष्ट्रात अपघात झाल्यास त्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे या योजनेतून राज्य सरकारकडून अपघातग्रस्तांना मोठा दिलासा देण्यात आला आहे.

बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेत पहिल्या ७२ तासांसाठी जवळच्या रुग्णालयांमधून उपचार करण्यात येतील. साधारण ७४ उपचार पद्धतीतून ३० हजार रुपयांपर्यंतचा खर्च मोफत केला जाईल. तसेच रुग्णालयाच्या वास्तव्यातील भोजनाचा समावेश सुद्धा यात असेल. मात्र औद्योगिक अपघात किंवा घरगुती अपघात, रेल्वे अपघाताचा यात समावेश होणार नाही, असे समजते.

योजनेचे स्वरुप पुढीलप्रमाणे –

अपघातानांतर पवहल्या ७२ तासात रस्ते अपघात झालेल्या व्यक्तीला तत्पर वद्यैकीय सेवा उपलब्ध करून देणे.

महाराष्ट्राच्या भौगोवलक सीमेतील कोणत्याही रस्त्यांवर अपघातामध्ये गांभीररीत्या जखमी झालेल्या व वद्यैकीय उपचाराची तात्काळ आवश्यकता असलेल्या व्यक्ती (अवधवासाच्या अटीवशवाय) या योजनेचा लाभ वमळण्यास पात्र असतील.

औद्योवगक अपघात, दैनंदिन कामातील किंवा घरी घडलेले अपघात व रेल्वे अपघाताने जखमी होणाऱ्या व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळणार नाही. तसेच व्दिरूक्ती टाळण्यासाठी या योजनेच्या लाभार्थ्यास शासनाच्या उपक्रमाच्या अपघात प्रतीपूर्तीच्या इतर कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही.

# नेव्हल कर्मचाऱ्याने गोळी झाडून केली आत्महत्या



मुंबई : घाटकोपरच्या नेव्हल डेपोत एका नेव्हल कर्मचाऱ्याने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली आहे. रायपाल सिंह कर्मचाऱ्याचे नाव आहे .आत्महत्या का केली याचे कारण समजू शकले नाही, या प्रकरणाची जोरदार चर्चा रंगली आहे. नेव्ही मध्ये गार्ड म्हणून कार्यरत असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. घाटकोपर पोलीस ठाणेचे अधिकारी घटना स्थळावर पोहोचले आहेत. घाटकोपर येथील मटेरियल ऑर्गनायझेशनशी संबंधित १०६ डीएससी पलटणातील शिपाई रायपाल पाल सिंग यांनी १८ ऑक्टोबर २० रोजी ड्युटिवर असताना गोळी झाडून आत्महत्या केली. ड्यूटी पोस्टवर बंदुकीच्या गोळीमुळे जखमी झाले होते. दोन फेऱ्या झाडून आत्महत्या केल्याची घटना घडली. स्वतःवर झाडल्या गेलेल्या सर्व्हिस रायफल त्यांच्या शेजारी सापडली होती.

# केंद्र सरकार हे परदेशातलं सरकार नव्हे; राज्यांना मदत करणं ही केंद्राची जबाबदारी - मुख्यमंत्री





मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सोलापुरातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. पाहणी केल्यानंतर पत्रकार परिषद घेत अतिवृष्टीचे संकट टळेपर्यंत नुकसानभरपाईसंदर्भात कोणताही निर्णय घाईने घेतला जाणार नाही, असं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितलं. यावेळी वेळ पडल्यास आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे मदत मागू, या वक्तव्याचा त्यांनी पुनरुच्चारही केला. आर्थिक मदतीच्या मुदतीवरून राजकारण करु नये, असं देखील मुख्यमंत्री म्हणाले.

अतिवृष्टीचं संकट टळलं नसून नुकसानभरपाईसंदर्भात कोणताही निर्णय घाईने घेतला जाणार नाही, असं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितलं. सध्या आम्ही माहिती घेण्याचं काम करत आहोत. विविध भागांमध्ये नुकसानीचे पंचनामेही सुरु आहेत. या सगळ्याचा अंदाज घेतल्यानंतर प्रत्यक्ष मदत जाहीर केली जाईल, असं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केलं. वेळ पडल्यास आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे मदत मागू, या वक्तव्याचा त्यांनी पुनरुच्चारही केला. केंद्र सरकार हे आपल्याच देशातील सरकार आहे, परदेशातील नव्हे. राज्यांना मदत करणे हे केंद्राचे कर्तव्य आहे, असं म्हणत मुख्यमंत्र्यांनी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना टोला लगावला. राज्यातील विरोधक केवळ पक्षीय राजकारणाचा विचार करत असतील. परंतु, देशाच्या सरकारला मदत करताना पक्षपात करून चालत नाही. अतिवृष्टीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मला फोन केला होता. त्यामुळे त्यांना या सगळ्याची जाणीव असेल, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं.

मृतांच्या नातेवाईकांना चार लाखांची मदत अतिवृष्टीमुळे मृत्युमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून प्रत्येकी चार लाख रुपयांच्या धनादेशाचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वाटप करण्यात आलं.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्कः-9594418181 / 8424989898